## प्रकरण तिसरे

## 'अपरंपार' आशयदृष्ट्या विचार

## प्रकरण तिसरे

## " अपरंपार ": आशयदृष्ट्या विचार

वि. शं. पारगांवकर हे १९६२ नंतर कादंबरी लेखनाकडे वळले. कथेच्या माध्यमाद्वारे मानवी जीवनातील सुख - दुःख चित्रित करण्यात व्याप्तीच्या मर्यादा पडू लागल्या. म्हणून व्यापक पातळीवर आशय मांडायला कादंबरी क्षेत्राची निवड केली.

त्यांच्या कादंबरी लेखनापाठीमागे एका विशिष्ट संस्काराची प्रेरणा आणि मालिका आहे. ज्या परिसरात त्यांचे बालपण गेले त्या वातावरणातील बालवयापासून जपलेले संस्कार कायम आहेत. तेच त्यांनी काही व्यक्तींच्या रूपाने साकार करण्याचा प्रयत्न कादंबरीच्या माध्यमातून त्यांनी केला आहे.

कथानक :

' अपरंपार ' ही पारगांवकरांची वेगळ्या वळणाची कादंबरी आहे. या कादंबरीमध्ये भूतकाळ व वर्तमानकाळ यावर आधारलेल्या वास्तव जीवनाचे चित्रण आलेले आहे. या कादंबरीचा आशयदृष्ट्या विचार करता त्यातील लैंगिक जीवनाचे विविधांगी दर्शन व त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या इत्यादींचा विचार केलेला आहे. लैंगिक सुखाच्या अतृप्तीने ग्रासलेल्या नंदा , सगुणा , श्रीनिवास , कुसुम या प्रमुख व्यक्तिरेखांच्या माध्यमातून समाजातील मध्यमवर्गीयांचे भावविश्वचित्रण करण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला आहे.

बीडच्या शहरी वातावरणात वावरणाऱ्या श्रीनिवासच्या विवाहापासून कादंबरीची

सुरुवात होते. श्रीनिवासच्या कुटुंबात शहरी संस्कार आहेत. अनेक मुलांप्रमाणेच श्रीनिवासला मालती ही एक थोराड बांध्याची, ग्रामीण संस्कार असलेली, शहरी रीतिरिवाज विशेष माहीत नसलेली मुलगी सांगून येते. मालतीचे डोळे आणि बोलणे ऐकणाऱ्याचे लक्ष वेधून घेणारे होते. तिचा आवाज अस्सल स्त्रीचा होता. तिच्या कपाळाचे कुंकू फार मोठे नव्हते. तिचे केस सुंदर होते. केसाच्या अंबाड्यात एक गुलाबाचे फूल खोचलेले होते. या सर्व सौंदर्यामुळे श्रीनिवास अस्वस्थ होतो. तसेच मालतीची लाल रंगाची साडी जरीचे काठ असलेली, त्यामुळे तिचे उरोज पाहणाऱ्यांचे लक्ष वेधून घेणारे होते. मालती रंगाने काळी- सावळी पण श्रीनिवासच्या मनात भरली होती. या आठवणीने त्याला रात्रंदिवस झोप येत नव्हती. सतत मालतीचा ध्यास त्याने घेतला होता.

जीवनाच्या सर्व अंगाने मुलगी पसंत करण्याऐवजी तरुणीचे शरीर, मादक अवयव आणि आकर्षक हालचाली इत्यादी बाबींकडे श्रीनिवासच्या चित्तवृत्ती ओढल्या जातात. इतर कोणत्याही गोष्टींपेक्षा कामजीवनाची समज श्रीनिवासला लवकर येते. आपली पसंती आईला, सगुणाबाईला तो कळवितो. सगुणाबाई श्रीनिवासला समजावून सांगतात. पण मालतीच्या सौंदर्यामुळे श्रीनिवास वेडाच झाला होता. त्याला आईचे शब्द पटत नाहीत. "बरं बाबा ! तुझं तू पाहून घे. ज्याचं दुःख त्यानंच भोगायचं असतं.

आपल्या आईच्या या बोलण्यामुळे श्रीनिवासच्या ह्रदयातले दुःखच जागे होऊन शब्दरूप धारण करीत आहेत, असा भास श्रीनिवासला होतो. आजपर्यंत श्रीनिवासने आपल्या आईकडे ' आई ' च्या दृष्टिकोनातून पाहिले होते. पण आज ' सगुणाबाई ' नावाच्या एका स्त्रीचे रूप त्याच्या समोर होते. श्रीनिवासच्या मनःपटलावरून मालतीची मूर्ती जात नव्हती. मालती आपली बायको असावी असे त्याला वाटते. " मुलगी बरोबरीची केली म्हणजे थोड्याच वर्षात मुलीची बाई होते, आणि मुलाचा पुरुष व्हायला फार वेळ लागतो. " [२] अशारीतीने सगुणाबाई स्वानुभवाच्या, अतृप्तीच्या वेदना बोलून दाखवितात. तसेच मुलीने तुला पसंत करायला हवे याची जाणीव सगुणाबाई करून देतात. या शब्दामुळे श्रीनिवासचा स्वाभिमान दुखावला जातो. स्त्रीला तृप्त करण्याची ताकद आपल्याजवळ नाही, असे त्याला वाटते. आपणांवर प्रेम करणाऱ्या कुसूमवर लक्ष ठेवले पाहिजे, असा विचार करून तो कुसूमला भेटण्यासाठी जातो.

कुसूम ही इंद्रनाथची पत्नी, ती श्रीनिवासवर मनापासून प्रेम करते. श्रीनिवास आपले सर्व भान विसरून आपण कोठे आहोत याची कल्पनादेखील त्याला नव्हती. डोक्यामध्ये कुसूमचा विचार व आईचे उपरोधिक बोलणे यामुळे तो आपले भान पूर्णपणे विसरून चालत होता. तेवढ्यात इंद्रनाथने श्रीनिवासला त्याच्या विचारातून जागे केले. " बरंय, रस्त्यानं नीट चालत जा. बाय बाय ! आणि हे बघ तुला कुसूमने एकदा घरी बोलावलंय. गेल्या कित्येक दिवसात तू घरी आलेला नाहीस. तिचा जीव टांगणी लागलाय. येऊन जा बाबा एकदा " [३] आणि पाहता- पाहता इंद्रनाथ

दिसेनासा होतो.

आपल्या मुलाच्या या अवस्थेमुळे नाना दुःखी होतात, अस्वस्थ होतात. कारण नानांना एकच मुलगा असल्यामुळे त्याची काळजी घेतात. त्याला कोणतेही दुःख होऊ नये याची खबरदारी ते स्वतः घेतात. त्याच्या सर्व भावना नाना ओळखत होते. श्रीनिवासच्या डोक्यावरून प्रेमाचा हात फिरवतात . त्याला जगाचा व्यवहारी दृष्टिकोन सांगतात. " संसारात स्त्री येणं ही आपल्याला प्रथम वाटते तेवढी आनंदाची गोष्ट नसते. मला कळतं तुझं मन " [४] हे वयच असे असते की कुणाला त्याची अगोदर चाहूल लागत नाही. ते स्वखुशीने सापळ्यात अडकतात आणि नंतर दुःखी होतात. पण त्याचा काहीच उपयोग नसतो, असाही औपचारिक सल्ला ते देतात. यावेळी श्रीनिवासला भूतकाळाची आठवण होते . त्याच्या साऱ्या स्मृती ताजून उठतात. असाच हात कुसूमने त्याच्या केसांतून तीन - चार महिन्यांपूर्वी फिरविला होता, ती दुःखी होऊन रडत होती . बराच वेळ गेल्यानंतर श्रीनिवासने तिच्या पाठीवरून हात फिरविला होता, अगदी नानासारखा.

श्रीनिवास कुसूमच्या हातातील पुस्तक वाचतो, " स्त्री पुरुषांचे संबंध नैतिक नसून नैसर्गिक आहेत. नीती ही गारुड्यानं आपल्या पोतडीतून काढलेल्या , दृष्टिभेद करणाऱ्या जादूप्रमाणे आहे. एकपत्नीव्रत हे दुर्बल पुरुषानं आपलं षंढत्व गुलदस्त्यात राहावं म्हणून स्त्रीवर केलेला एक जुलूम आहे. पराक्रमी पुरुषाला , राजेरजवाड्यांना , संस्थानिकांना , जहागिरदारांना अनेक बायका करता येतात ; पण नाकासमोर

चालणाऱ्या , सरळमार्गी पापभीरु माणसाला मात्र स्वतःच्या बायकोजवळ देखील बळजबरी करता येत नाही. द्रौपदीला पाच भ्रतार होते . सीतेला एकच नवरा होता. आणि श्रीकृष्णाला मात्र सोळासहस्त्र नारी होत्या ! यात स्त्री पुरुष संबंधाविषयीची नीती कुठे आहे ? " [५] यातील स्त्री- पुरुषसंबंधाच्या नीतिविषयक कल्पनांनी श्रीनिवास भारावतो.

श्रीनिवासचा नंदाशी विवाह होतो. आपल्या आई - वडिलांचे वैवाहिक जीवन पाहून तो अस्वस्थ होतो. सगुणाबाईच्या लैंगिक वासना नाना तृप्त करू शकत नाहीत. त्यामुळे सगुणाबाई त्यांचा कायमचा तिरस्कार करतात. आपल्या अतृप्त लैंगिक वासना संधी मिळेल तेव्हा त्या भागविण्याचा सतत प्रयत्न करतात. नंदाला न्हाणू घालताना, तेल लावताना तिचे हात जोराने दाबतात. मांड्यांना तेल लावताना सगुणाबाईंचे हात अधिकच स्वैर सुटतात. त्या निराळ्या स्पर्शाची जाणीव नंदाला होते. त्यात धड स्त्री स्पर्शाचा हळुवारपणाही नाही. आणि धड पुरुषाची धडकही नाही. तर त्या कुठल्यातरी विकृतीने पछाडल्यासारख्या वाटत होत्या. या घटनेची आठवण श्रीनिवासच्या सान्निध्यात नंदाला होते. कारण सगुणाबाईसारखी सणक श्रीनिवासमध्ये असल्याचे तिला अनुभवास येते.

नंदा दुपारी विश्रांती घेत असताना सगुणाबाई नंदाच्या शेजारी येऊन खुर्चीवर बसतात. सगुणाबाईंना अशा मनःस्थितीत पाहून तिला मागचा प्रसंग आठवतो. सगुणाबाई यावेळी कुसूम व श्रीनिवास यांच्या प्रेमाची माहिती नंदाला देतात.

श्रीनिवासच्या कामवासनेतील अघाशीपणाची आणि आवेगाची आठवण नंदाला होते. अतृप्तीच्या निराशेने ती अस्वस्थ होते. अशा अवस्थेत सगुणाबाई नंदावर हल्ला करतात. नंदाला आपल्या मिठीत घेतात , तिचे चुंबन घेतात . आपल्याला पडलेले पुरुषी स्वप्न सांगतात. नानाला दाढी नाही, याचेही दुःख नंदाजवळ सगुणाबाई व्यक्त करायला विसरत नाहीत. " पुरुषांच्या गालावर दाढीचे खुंट नसेल की किती विचित्र वाटते नाही! अगदी एखाद्या गोगलगायीवर पाय पडल्यावर जसं वाटतं तसं ! नाही का ? " [६] सासूबाईंच्या प्रश्नार्थक वाक्याला कोणत्याप्रकारे उत्तर द्यावे हे नंदाला कळत नाही.

सायंकाळच्या वेळी सगुणाबाई देवाला जातात. घरी फक्त नाना , श्रीनिवास व नंदा असतात. सायंकाळच्यावेळी भाजी कोणी आणायची असा प्रश्न नंदा विचारते त्यावेळी नाना घरात लागणाऱ्या सर्व वस्तू मी आणेन असे सांगतात. आपल्या मुलाने जीवनाचा उपभोग योग्य वेळी घ्यावा असे नानांना वाटते. त्यांच्या आनंदात ते आपला आनंद मानतात. पुढे श्रीनिवास व नंदा फिरायला जातात. नंदाला श्रीनिवासच्या आविर्भावाचे गोड कौतुक वाटते. कारण दोघांमध्ये एक नवीनच जीवन निर्माण झाले होते. श्रीनिवासच्या सहवासाने ती सुखी झाली होती.

नाना पोपटाशी संवाद करतात. त्याची देखभाल स्वतः नाना करताना दिसतात. घरातील लोकांना कसे बोलवायचे याचे शिक्षण नानांनी पोपटाला दिले होते. मुक्या प्राण्याला फार जपले पाहिजे असे नाना नंदाला सांगतात. त्यांच्या या सांगण्यामध्ये त्यांची अतृप्तता आणि भावनिक अस्थिरताही दिसून येते. त्यांच्या

बोलण्यातून नंदाला सासूबाईंच्या स्वप्नाची आठवण होते. नाना घरातील अनेक कामे प्रेमानेच करून घेत असत.

श्रीनिवास व नंदा सायंकाळच्या वेळी फिरायला जातात. त्यावेळी आनंदाने एकमेकांच्या आयुष्यातील प्रसंग अगदी स्वच्छ भावनेने सांगत राहतात. श्रीनिवास आयुष्यामध्ये आलेले अनेक प्रसंग सांगतो. पण कुसूमच्या प्रेमामुळे नंदा दुःखी होते. तिच्या मनामध्ये अनेक प्रश्न निर्माण होतात. श्रीनिवासने लग्न का केले ? याचे प्रेम दुसऱ्याबरोबर होते तर माझ्याबरोबर लग्न करणे योग्य होते का ? अशा अनेक प्रश्नांनी तिचे डोके गरगरू लागते. श्रीनिवासकडे पाहण्याची तिला इच्छा उरलीच नाही.

नाना आणि कुसूम यांच्या उणिवांचा परिणाम नंदावर होतो. कुसूमचे दुःखही श्रीनिवासकडून कळते. ज्या दिवशी इंद्रनाथला कुसूम हवी असते त्या वेळेस कुसूमला मारपीट केल्याशिवाय समाधान मिळत नाही. " एखाद्या रात्री तर तिचे गाल सुजतात. पाठ हुळहुळीत होते. दिवस दिवस तिला श्वास घेता येत नाही. इतका इंद्रनाथ तिला मारतो. कुसूमचे सर्व शरीर थंड होऊन लुळं पडते. तेव्हा मग तिच्या दोन्हीही काखेत हात घालून रात्रभर सुख घेतो. " [13] कुसूमला पुरुषाच्या शरीराची आणि दृष्टीची किळस आलेली आहे. केवळ वडिलांच्या तंबीमुळे तिला लग्न करावे लागते. एखाद्या लांडग्याने शेळीवर तुटून पडावे अशी इंद्रनाथची कृती कुसूमला वाटते. लहानपणी कुसूम लग्नाला गेली असता , नवीन मुलामुलींच्या ओळखी होतात. रात्री झोपायला अकरा - बारा वाजतात. जिथे जागा सापडेल तिथे सारे झोपतात.

कुसूमला एकदम जाग येते. ती एका विचित्र अवस्थेत , तिला त्या वेदना असह्य होतात. ओरडता येत नाही. कुसूमच्या तोंडावर त्या इसमाचा तळवा असतो. तोंड घट्ट दाबून धरले होते. कानात तो हळूच म्हणत होता " ओरडू नकोस , तुला काही होत नाही , थोडावेळ कळ सोस. " ⁶ त्याच्या हालचाली अत्यंत क्लेशदायक वाटत होत्या. परंतु तो विलक्षण धुंदीत असतो. या घटनेपासून कुसूममधील स्त्रीत्व लोप पावलेले असते.

कुसूम म्हणजे फक्त हाडामांसाची स्त्री उरते. तेव्हापासून कुसूम पुरुषाला चांगली ओळखते. पुरुषांची दृष्टी, चालणं , बोलणं , हसणं या साऱ्या पाठीमागचा हेतू आणि पाशवीपणा याची तिला ओळख पटू लागते. पुरुषांविषयीची तिरस्काराची भावना तिच्या मनांत निर्माण होते. श्रीनिवासवर असलेले कुसूमचे प्रेम मानसिक आहे. शारीरिक प्रेमाची तिला गरज नाही. ते तिला पेलवत नाही . इंद्रनाथ देखील तिला नको आहे. तिच्या दृष्टीने इंद्रनाथ एक आपत्ती आहे. श्रीनिवास नंदाला प्रेम देऊ शकणार नाही. याची जाणीव कुसूम नंदाला करून देते.

नंदाला झोपेत पडलेले स्वप्न विचित्र असते. तिच्या स्वप्नात श्रीनिवास रात्री आपल्याजवळ नाही तर तो कुसूमकडे गेला आहे. आपला नवरा कुसूमची काळजी आहे. तिला वरचेवर भेटत आहे. त्यानंतर गिरणीवाल्याची आठवण होते. कु... प्रसंग तिच्या डोळ्यांसमोर येतो. कुसूम व नंदा या दोघींची भेट व या भेटीमध्ये श्रीनिवास , श्रीधर यांचे विषय येतात. कुसूमने आपल्या जीवनात इंद्रनाथ कसा आला

याचा केलेला उलगडा , श्रीनिवासवर असणारे प्रेम , कुसूमने नंदाला आपल्या आयुष्यातील घडलेल्या घटना सर्व सांगणे इत्यादी प्रसंग नंदाला स्वप्नात दिसतात. हे स्वप्न आहे की सत्य असा तिला भास होतो. ती ज्यावेळी जागी होते . त्यावेळी श्रीनिवास तिच्याजवळ झोपला होता. सर्वत्र शांतता होती; पण नंदाचे मन या स्वप्नांनी बेचैन झाले होते. हे स्वप्न आहे यावर तिचा विश्वासच बसेना.

श्रीनिवास, सगुणा , नाना आणि कुसूम यांच्या विलक्षण वर्तनाचा परिणाम नवविवाहित नंदाच्या मनावर होतो . ती अस्वस्थ होते. एका विशिष्ट परंपरेचे संस्कार झालेल्या नंदाला हे सर्व नवीन वाटते. प्राप्त संकटांतून मुक्त होण्यासाठी म्हणून काही दिवस ती आपल्या माहेरी जाते. अवेळी माहेरी आलेल्या मुलीला पाहून नंदाच्या आईला भयंकर भीती वाटते. नंदा माहेरी आल्यानंतर सासरच्या लोकांविषयी काहीच बोलत नाही. त्यामुळे नंदाच्या आईचे मन अनेक प्रकारच्या शंकांनी पोखरले जाते. " अशी एकाएकीच आलीस ! अगोदर काही कळवायचं वगैरे नाही वाटतं ? अन् हो, थांब तिथंच जरा. " [१] आणि गडबडीने ती भाकरीचा तुकडा नंदाच्या अंगावरून ओवाळून टाकते. नंदाची आई संस्कृती जपणारी आहे. आपल्या मुलीने सासरी योग्य रहावे असे तिला वाटते. आणि हेच संस्कार नंदाच्या बालमनावर झालेले होते. पण लग्न झाल्यापासून तिला मानसिक स्वास्थ्य नव्हते. अनेक विचारांनी ती ग्रासलेली होती. पण आईच्या या सुसंस्काराने तिला गलबलून येते. कारण गेल्या कित्येक महिन्यांमध्ये असा प्रसंग सासरी घडलाच नव्हता . जिव्हाळा , माया , रीतभात या

सर्वांनी नंदाच्या डोळ्यांत पाणी येते.

माहेरी नंदाची मैत्रीण, चंद्रा ही वैवाहिक जीवन सुखात घालवीत असल्याची जाणीव नंदाला होते. चंद्राला दिवस गेलेले आहेत, हेही तिला समजते. त्यामुळे नंदा अधिकच खजील होते. मोठ्या संयमाने ती स्वतःला सावरण्याचा प्रयत्न करते. कारण लग्नानंतरही नंदा सुखी नाही याची जाणीव चंद्राला होते. पंधरा दिवस माहेरी येऊनही सासरचे, श्रीनिवासचे पत्र नंदाला येत नाही या घटनेने तर नंदाच्या आईला अधिकच चिंता वाटते. आपली चिंता नंदाजवळ ती व्यक्त करते. तेव्हा नंदा म्हणते, " नुसत्या जनरीतीप्रमाणं सारं होत गेलं की माणूस सुखी होतो का गं ? " [२०] या प्रश्नाने ती आईला निरुत्तर करते. स्त्रीच्या जीवनात लाजिरवाणे वाटणारे दुःख आपल्या वाट्याला आल्याचे ती चंद्राला सांगते. " तुझ्या नवऱ्यापासून तुला सुख मिळतं का गं ? " [२१] या नंदाच्या प्रश्नाने चंद्राला धक्काच बसतो. चंद्राच्या लक्षात येते की, नंदा आपल्या आयुष्यामध्ये सुखी नाही. तिचे दुःख खूप मोठे असावे असे चंद्राला वाटते. यावर चंद्रा नंदाला म्हणते, " नंदा, दुःखी होऊ नकोस. अगोदर नाही नीट जमत नवरा - बायकोचं. पुढं आपोआप जमायला लागतं. दम काढावा लागतो. सोसावं लागतं. पण त्यातून जावं लागतं नंदा ......" [२२] यावेळी नंदा काहीच बोलत नाही. काय बोलावे हे तिला कळत नव्हते. सासरा, सासू, नवरा, सारं घरच......तिचा जणू तिथं पुनर्जन्मच झालेला होता. शिवाय इंद्रनाथ - कुसूम आणि

कुसूम - श्रीनिवास या सर्वांचा कशाचा कशाला मेळ नव्हता. सारंच विचित्र होतं, दुःखद होतं आणि तितकंच अनाकलनीय होतं.

नंदा दुःखी अवस्थेत सासरी येते. त्यावेळी घरी कोणीच नसते. फक्त नाना झोपलेले असतात. नंदा माहेरहून आणलेली पिशवी बैठकीच्या ओसरीवर ठेवते आणि हात- पाय धुवून, स्नो - पावडर, केस नीटनेटके करुन अगदी प्रसन्न दिसू लागते.

तोपर्यंत नाना नंदाला पाहून आनंदी होतात. सर्व माहेरची खुशाली विचारतात. आणि घरचे वातावरण आपण गेल्यापासून कसे होते हे देखील सांगतात. नानांना नंदाबद्दल आत्मिक प्रेम आहे. आपल्या मनातील अनेक प्रश्न अगदी सहजपणे ते नंदाला सांगतात. नंदा सासूबाईविषयी ज्यावेळी विचारते त्यावेळी नाना मोठ्या रागाने सांगतात. हा त्यांचा राग फक्त सासूबाईंबद्दल असतो. या सांगण्यातून त्यांची अतृप्तता दिसून येते. ते म्हणतात, " बरोबर कशाला हवेय त्यांना ? एकट्याच गेल्यात "...... सकाळपासून गाजावाजा चालला होता, सिनेमाचा. " [२३] नाना बायकोविषयीची नाराजी सुनेजवळ व्यक्त करतात.

नंदा नानांना चहा करते तेव्हा नाना अधाशीपणाने नंदाकडे पाहतात. त्यांच्या या पाहण्यामध्ये एक वेगळीच दृष्टी असते. ते म्हणतात, " किती दिवस राहिलीस सूनबाई माहेरी ? " [२४] या त्यांच्या बोलण्याने नंदा काहीच बोलत नाही. ती स्वतःला सावरते. त्यांच्या या शब्दांमुळे तिचे मन खुलले होते. आपल्या माघारी या लोकांना आठवण होते, याचे नवल तिच्या चेहऱ्यावर दिसून येत होते. नाना देवाला जातात ;

आणि घरी श्रीनिवास उशीरा येणार आहे याची कल्पना देतात.

नाना देवाला गेल्यानंतर नंदा घरी एकटीच राहते. तिच्या मनामध्ये अनेक प्रश्न उभे राहतात. हे सर्व प्रश्न सासरचे असतात. लग्न हे पुनर्जन्म होण्याऐवजी एक आजारच झालेला होता. साऱ्या भावना, आकांक्षा तिने मारल्या होत्या. कधीही न संपणारे दुःख तिच्यासमोर उभे ठाकले होते.

तेवढ्यात इंद्रनाथ तिच्या पाठीमागे उभा राहतो. या त्याच्या येण्याने ती भयभीत होते. तिला एकाएकी चक्कर येते आणि इंद्रनाथच्या अंगावर ती कोसळते. यावेळी इंद्रनाथ तिला सावरण्याचा प्रयत्न करतो आणि पलंगावर बसवितो. नंदा त्याच्या चेहऱ्याकडे पाहतच राहते. "मला क्षमा करा. तुम्ही केवढ्यांदा दचकलात मला पाहून! मी कोणी पिशाच्च वगैरे नाही" [२५] या इंद्रनाथच्या बोलण्याचे तिला हसू येते. त्याचा स्पर्श अजून तिच्या अंगावर रेंगाळत होता.

इंद्रनाथच्या स्पर्शाने नंदाच्या भावना तृप्त झाल्या होत्या. त्या स्पर्शाने तिला स्वर्गात गेल्यासारखे वाटले. श्रीनिवासच्या स्पर्शापेक्षा हा स्पर्श वेगळा वाटला होता. त्याच्या पुरुषी बोलण्याचा परिणाम तिच्या मनावर झालेला होता. त्याचा पुरुषी कणखर आवाज, त्याचे पाहणे आणि चालणे ऐटदार होते. कोणत्याही स्त्रीने पुलकित व्हावे असे चैतन्य त्याच्या चेहऱ्यावर होते.

इंद्रनाथला पाहताच नंदाच्या भावना उचंबळून येतात. त्याच्याकडे असेच पाहत राहावे, असे तिला वाटते. सर्व शरीर थरथर कापते. एक निराळीच शक्ती, एक निराळीच

उर्मी तिच्या शरीर - मनात सरसरून गेली . अशावेळी ती स्वतःला सावरण्याचा प्रयत्न करते. इंद्रनाथचे स्वागत ती चांगल्या प्रकारे करते. माहेरहून आणलेला पदार्थ ती प्रेमाने देते.

इंद्रनाथ आपले मन नंदाजवळ व्यक्त करतो. आपले विचार , आपले मन किती चांगले आहे हे तिला स्पष्ट सांगतो. तो म्हणतो , " खरंच, तुमच्या स्पर्शातून मला तुमची ओळख पटली " [२६] या त्याच्या बोलण्यातून नंदाला आनंद होतो. साऱ्या प्रसंगाची आठवण होते , या गोड आठवणीने तिचा चेहरा शरमेने लालीलाल झाला होता. थोड्या वेळाने ती म्हणाली , " माणूस सहवासाशिवाय खरा कळत नाही. सांगण्या - वागण्यावर काय विश्वास ठेवायचा " [२७] असे ती स्पष्टपणे सांगते. नंदाचा विचार इंद्रनाथला पटला होता. त्याच्या मनामध्ये नंदाविषयी प्रेम निर्माण होते. तो तेथून जाताच नंदा नाराज मनाने त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे डोळे भरून पाहतच राहते.

सायंकाळच्या वेळी नंदा उदास - उदास वाटत होती. ती एकटीच माडीवर उभी होती. तिच्या मनामध्ये अनेक प्रश्न निर्माण झाले होते. अतृप्तीची छटा तिच्या चेहऱ्यावर दिसत होती. तेवढ्यात सगुणाबाई येतात आणि नंदा केव्हा आली म्हणून चौकशी करतात. नंदाला सगुणाबाईंच्या सर्व अंगाचा वास येत होता. हा वास सिगारेटचा होता. पण सासूबाईंना विचारणार कोण ? सासूला तिने नमस्कार केला. सगुणाबाईंनी आपले विचार नंदापुढे व्यक्त केले. " अस्सं, मी गेले ते बाई सिनेमाला

! कधी घरातून मेले बाहेर पडायलाच होत नाही . त्यांना तर कसली - कसली हौस नाही. आहे ते बरं आहे झालं . बरं , पण देवापाशी दिवा - तेलवात काहीच कशी केली नाहीस ! आणि मोरीवर कपबशा पडल्यात , कोणी आलं होतं काय चहाला ?" [२८]

सगुणाबाईच्या एकंदरीत वागण्यात व बोलण्यात खूप फरक पडला होता. आपल्या अतृप्त भावना बाहेर तृप्त करून घेत होत्या.

श्रीनिवास थोड्या वेळापूर्वीच घरी आला होता. त्याने जेवण न करताच थोडे दूध घेउन तो माडीवर गेला होता. नंदाची व त्याची दृष्टिभेट झाली होती. थोड्यावेळाने नंदा वरती गेली तेव्हा श्रीनिवास उगीचच पुस्तक वाचत पडला होता. नंदाला पाहताच त्याच्या कामवासना जाग्या होतात. श्रीनिवास तिच्याजवळ जातो आणि हलक्या हाताने तिचे दोन्हीही हात धरतो आणि पलंगावर आणून बसवितो. आतापर्यंतच्या दुराव्यामुळे स्पर्शामुळे तिच्या रक्तातील थैमन् - थैम तापून उठला होता. तिचं सर्वांग पुलकित झाले होते. ती डोळे मिटून स्वस्थ पडून राहिली. तिच्या साऱ्या भावना यावेळी उचंबळून आल्या होत्या. साऱ्या देहाचा आटा - पिटा , सारा आकांत चालला होता. तिची तळमळ शमण्याऐवजी ती अधिक वाढली होती. श्रीनिवास भिंतीकडे तोंड करुन स्वस्थ झोपला होता. आणि नंदाचे डोळे काळोखात सताड उघडेच होते. जवळच स्वस्थपणे झोपलेल्या श्रीनिवासचा तिला संताप आला. त्याला जागे करावे आणि ...... तिला एकाएकी सासूबाईंची आठवण होते ; आणि मघाशी येऊन गेलेल्या इंद्रनाथचीही आठवण होते. तिच्याजवळ आता काही उरले नव्हते. ती धपापत राहिली , विझून गेली आणि

वांझोट्या मनानं ती झोपी गेली.

या कथानकानंतर व्यक्तिचित्रणांचा विचार करावयाचा आहे.

**व्यक्तिचित्रण :**

**नंदा :**

ही व्यक्तिरेखा संपूर्ण कादंबरीमध्ये महत्वाची ठरली आहे. याचे कारण नंदा या व्यक्तिरेखेमुळे कथानक उलगडत जाते. विवाहापूर्वीचे तिचे जीवन सुखमय आहे. आईचे प्रेम , अनेक मैत्रिणींचा सहवास यामुळे तिचे बालपण सुखात जाते. एकूण तिचे माहेर संस्कारमय व प्रेमळ आहे. आई - वडील, भाऊ यांच्या प्रेमात वाढलेल्या नंदावर अनेक चांगले सुसंस्कार झाले आहेत.

नंदा सुंदर आहे. नाक, डोळे अंत्यत रेखीव व बोलके आहेत. उंची व जाडी याचा तोल तिने बरोबर सांभाळलेला आहे. वर्ण गोरा, कांती तजेलदार आणि बोलके डोळे या सर्व सौंदर्याने कोणाचेही मन आकर्षून घेईल अशी नंदा आहे. एक दिवस तिच्या लग्नाचा विचार होतो. आणि शहरी श्रीनिवासबरोबर तिचा विवाह करण्याचा विचार आई- वडील करतात. नंदा श्रीनिवासपेक्षा देखणी व चारित्र्यसंपन्न होती. अनेक संस्कार असलेली नंदा श्रीनिवासच्या घरी पत्नी म्हणून येते. अनेक अपेक्षा उराशी बाळगून ती रहात असते. सासर तिने काही दिवसातच जिंकले होते. अशी स्वाभिमानी व प्रेमळ नंदा आहे.

नंदा ही श्रीनिवासची पत्नी आहे. एका खेड्यातून आलेली श्रीनिवासला समजून

घेण्याचा ती सतत प्रयत्न करते. विशिष्ट परंपरांच्या संस्काराने ती वाढलेली आहे. त्यामुळे श्रीनिवासचे वागणे तिला खटकते. नंदाला आपल्या नवऱ्यापासून पूर्ण शरीरसुख मिळत नाही. श्रीनिवास हा कुठल्यातरी विकृतीने पछाडलेला दिसतो. सगुणाबाई, नंदाची सासू ही देखील नंदाला वेगळ्याच स्त्रीचे दर्शन घडविते. सगुणाबाईंच्याही लैंगिक इच्छा तृप्त झालेल्या नाहीत. त्यामुळे एक दिवस नंदाकडून पुरुषी इच्छा पूर्ण करुन घेण्याचा प्रयत्न करतात. भर दुपारी नंदा विश्रांती घेत असताना तिला आपल्या मिठीत घेतात. नानांचे निस्तेज पौरुषत्व, सगुणाबाईंचे विक्षिप्त वर्तन, श्रीनिवास व कुसुम यांचे संबंध या सर्व घटना नंदाला अस्वस्थ करणाऱ्या आहेत. आपले माहेर आणि सासर यांच्यातील तुलना ती आपल्या मनाशी करून पाहते. परंतु सगुणाबाई आणि आपली आई यांच्यातील फरक नंदाला तात्काळ जाणवतो व ती दुःखी होते. आपले दुःख विसरण्याचा ती प्रयत्न करते. त्यासाठी नंदा माहेरी जाण्याचा निर्णय घेते. नंदा माहेरी गंभीर व दुःखी दिसते. नंदाने पूर्वसूचना न देता अवेळी माहेरी येणे ही घटना तिच्या आईला विचार करण्यास प्रवृत्त करते. मोठ्या संयमाने नंदा स्वतःला माहेरी आल्यानंतर सावरण्याचा प्रयत्न करताना दिसते. नुसत्या जनरीतीप्रमाणे सारे होत गेले की माणूस सुखी होतो का गं? या एकाच स्वच्छ प्रश्नाने नंदा आपल्या आईला निरुत्तर करते.

नंदाची बालपणाची मैत्रीण 'चंद्रा' माहेरी आलेली आहे. परंतु ती सुखी आहे. तिला दिवस गेलेले आहेत ही घटना नंदाच्या दुःखात भर टाकणारी आहे. नवऱ्यापासून

तुला सुख मिळते का गे ? असा प्रश्न चंद्राला विचारून आपली खंत , वेदना , असहाय्यता ती मैत्रिणीजवळ बोलून दाखविते. ऐन तारुण्यात परंपरेचा बळी ठरून अपरंपार दुःख सहन करणाऱ्या नंदाचे चित्रण अतिशय बोलके रेखाटण्यात पारगांवकर यशस्वी झालेले आहेत.

आईचा उपदेश व नंदाचा आज्ञाधारकपणा दिसून येतो. " तुझा जन्म स्त्रीचा आहे. दुसऱ्याचं घर आता तुला आपलं समजायला हवे. आपलं करायला हवं आणि ? " " ती थोडे थांबली , मग काही एक निश्चय केल्यासारखा ती पुढे म्हणाली ; आणि असं बघ , तुझा नवरा जे म्हणेल ते ऐकायला हवं. आणि तो तुझ्यापासून जे मागेल ते द्यायला हवं .... लक्षात ठेव "[२९] हे शब्द होते आईचे आणि आताचे सासूबाईंचे शब्द या दोहोंमध्ये किती फरक आहे हे नंदाच्या एकूण चर्चेवरून स्पष्ट होते.

नंदाला सासूबाई पुरुषी आकारात दिसू लागल्या , त्यांनी मघाशी तिला जे स्वप्न सांगितले होते त्या स्वप्नातल्याप्रमाणे , तिची तिलाच स्वतःच्या मनात निर्माण होऊ पाहणाऱ्या भावनांची धास्ती वाटली. लग्नापूर्वी हे सारे विश्व तिला अगदीच अपरिचित होते. लग्न या शब्दाचा अर्थ आणि संसार शब्दाची तिची व्याख्या अगदी बाळबोध होती. केवळ आई - वडीलांच्या आणि आजूबाजूच्या संसाराकडे पाहून झालेली . तिला या शहरातले जीवन नवीन होते. या घरातील जीवन तर त्याहीपेक्षा नवीन होते. सासरच्या लोकांची वागणूक , त्यांची विचारसरणी , त्यांचा एकमेकांकडे पाहण्याचा दृष्टीकोन या सर्वांतच तिला वेगळेपणा दिसत होता.

मोठ्यांचा आदर करणे, त्यांच्या आज्ञेत राहणे हे संस्कार तिला लहानपणापासून जडलेले आहेत. एक दिवस नंदा व श्रीनिवास फिरायला जायचे ठरवतात. पण नंदा नानांची परवानगी घेते. घरी काय आहे, नाही याची सर्व चौकशी करते. बाहेर फिरण्यास श्रीनिवास नेत आहे त्याचा तिला आनंद होतो. नंदाला श्रीनिवासच्या आविर्भावांचे कौतुक वाटते. त्या दोघात एक नवीनच जीवन निर्माण होऊ लागले होते. लग्नापूर्वी नंदा एक साधी तरुणी होती. माहेरचं वातावरण अगदी साधं- बालबोध होतं. सौंदर्याविषयीच्या कल्पनादेखील फारशा जागरूक अथवा डोळस नव्हत्या. स्त्री-पुरुषाविषयक भावनांना वेगवेगळे पैलू तिच्या मनात पडलेले नव्हते. भाऊ, चुलते, चुलतभाऊ इतकेच आणखी एक तरुण, पती म्हणून आयुष्यात यावयाचा होता. त्याची चाहूल नुकतीच निर्माण झालेली होती. तारुण्याने डोळे उघडलेले होते आणि मनात पडणारी प्रतिबिंबे रोमांचकारक, रंगीत होऊ लागलेली होती. परंतु आता प्रत्यक्ष लग्न झाले होते. श्रीनिवासचा सहवास मिळाला होता. त्याच्या स्पर्शात शरीर व मन संपूर्णपणे आले होते. एक नवीनच जीवन तिच्याभोवती विणलं जाऊ लागले. अशा रीतीने नंदा आज अनेक सुख - दुःखाच्या गोष्टी ऐकत होती, तर काही प्रत्यक्ष पाहत होती.

नंदाला प्रश्न पडतो की, या गृहस्थाने आपल्याशी लग्न का केले ? याचे प्रेम कुसूमवर होते तर आपल्या आयुष्याचे वाटोळे करण्याचा याला काय अधिकार होता ? नंदाचे डोके गरगरू लागले. डोळे असून डोळ्यांना काही दिसेनासे झाले. डोळे वर

करून श्रीनिवासकडे पाहण्याची तिला इच्छा उरलीच नाही. आपल्या संसाराचे काय होणार ? घरात एरवी सासूबाईंचा सहवास आणि नवऱ्याचा सहवास . या ठिणग्या पाहता पाहता तिच्या भोवती पाश आवळला जात होता. लग्न करून संसाराचे नंदनवन निर्माण करण्यास निघालेली नंदा आत्ताच पुरती घायाळ झाली होती.

कुसूम लहानपणीचा प्रसंग सांगताना नंदाला गहिवरून आले होते. अशा दुःखी स्थितीत तिला आपला संसार विचित्र वाटतो. मनामध्ये अनेक प्रश्न निर्माण होतात. हा कसला संसार ? , हे कसले घर होते ? , सासूबाई काय बाई आहे ? , हिचे वागणे काय ? , तिचं नवऱ्याविषयीचं मत काय ? अशा अनेक प्रश्नांनी नंदाचे डोके भणभणू लागले. खऱ्या- खोट्यांचा विवेक सुटत चालला होता. कुसूमला नंदाने एक प्रसंग सांगितला . हा प्रसंग सांगताना तिच्या डोळ्यांतून पाणी येते. " काही दिवसांपूर्वी आम्ही दोघं फिरायला गेलो होतो. तेव्हा तिथं एक दृश्य पाहिलं. एक स्त्री संपूर्ण नागवी होती. तिच्यामागं लहानमोठी पोरं - टोरं लागलेली होती. लोक तिला वेडी समजत होते. पण ती वेडी नव्हती. तिचे सारसर्वस्व तिच्या मर्जीविरुध्द लुटले गेले होतं. तिचं शील नुसतच लुटलं गेलं नव्हतं तर रस्त्यावर आणलं गेलं होतं ! " [२०]

नंदा आणि कुसूम या दोघींवर असेच अत्याचार होत असतात. त्या वेड्या संवेदना , सहनशीलता संपली होती. या दोघी हे दुःख सोसत आहेत.

कुसूम यावर काहीच बोलली नाही . दोघीही असहाय्य होत्या . त्यांचं आयुष्य एखाद्या लंबकाप्रमाणे होते. केवळ कुणाच्या तरी भोवती आणि कुणासाठी तरी फिरत

राहायचं . असे या दोघींचे जीवन होते. इतके दुःख सहन करून देखील श्रीनिवासबद्दल नंदाच्या मनात प्रेम आहे. आपल्या अनेक सुख - दुःखाच्या गोष्टी श्रीनिवासजवळ ती बोलून दाखवते इतकी ती प्रामाणिक आहे. श्रीनिवास घरी येताच त्याला चहा देणारी , त्याच्याबरोबर गुजगोष्टी करणारी नंदा आहे. साधे माहेरी जायचे म्हटले तर सासू , सासरा, व पती यांना विचारीत असे. सासूबाई व नाना यांच्याबद्दल आदर असणारी नंदा एकुण सर्व व्यक्तिरेखेपेक्षा वेगळी आहे.

नंदाच्या एकूण आयुष्याचा शेवटच होत आला होता. तिचे मन कोठेही रमत नव्हते. सासर , माहेर , मैत्रिणी यामध्ये तिला रस नव्हता. संपूर्ण जीवनच निराशामय होत चालले होते . सासू, सासरा , नवरा , सारं घरच.... तिचा जणू तिथे पुनर्जन्मच झालेला होता. शिवाय इंद्रनाथ - कुसुम , आणि कुसुम - श्रीनिवास. कशाचा कशाला मेळ नव्हता. नंदाच्या आयुष्याला नुकतीच सुरुवात झाली होती. पण कित्येक दिवशी तिचा जीव टांगला जात होता. तिला काहीच कळत नव्हते. सर्व काही सांगण्याच्या बाहेरचे होते. या सर्व विचाराने तिचे डोके भणभणू लागले . ती स्वतःच्याच भाव समाधीत शिरली होती.

लहानपणी बडबडणारी नंदा , अवखळ नंदा , भांडणारी नंदा आणि तितक्याच पोटातल्या गोष्टी सांगणारी नंदा , प्रेम देणारी नंदा; पण आज विलक्षण बदलली होती तिने आपल्याभोवती जणू एक कोषच निर्माण करून घेतला होता.

एक दिवस माहेरहून ती सासरी येते. सासरी येते त्यावेळी घरी कोणीच

नसते. फक्त नाना घरी झोपलेले असतात. पण तेही काही वेळाने देवाला जातात. नंदा घरी एकटीच राहते. तिच्या मनामध्ये अनेक विचार येतात. तेवढयात इंद्रनाथ घरी येतो आणि तिच्या पाठीमागे उभा राहतो. त्यावेळी इंद्रनाथला पाहून तिला चक्कर येते. इंद्रनाथ तिला सावरतो. तिला समजावण्याचा प्रयत्न करतो. पण इंद्रनाथचे बोलणे व स्पर्श तिला हवाहवासा वाटतो. तिच्या मनामध्ये इंद्रनाथ विषयी प्रेम निर्माण होते. त्यामुळे ती माहेरहून आणलेले पदार्थ त्याला खाण्यास देते. चहापाणी करते. इंद्रनाथच्या स्पर्शाने तिच्या इच्छा पूर्ण झाल्या होत्या. श्रीनिवासच्या स्पर्शापेक्षा इंद्रनाथचा स्पर्श तिला हवाहवासा वाटत होता. श्रीनिवासच्या सहवासात तिला सुख मिळत नाही. ती असमाधानी असते. तिचे अटळ, तीव्र दुःख खरच अपरंपार होते. इंद्रनाथच्या सहवासाने हे दुःख अधिक तीव्र होते.

**श्रीनिवास :**

या कादंबरीत श्रीनिवास या प्रमुख पात्राबरोबर कादंबरीतील भावविश्वात संबंधित अशी सुमारे अकरा पात्रे कादंबरीत आणली आहेत. त्यात बीडच्या शहरी वातावरणात वावरणारा प्रतिष्ठित विचारवंत श्रीनिवास हा नानांचा मुलगा. श्रीनिवासच्या कुटुंबात शहरी संस्कार आहेत. जनरितीप्रमाणे श्रीनिवासचे लग्न ठरविण्याचा प्रयत्न असतो. कोणत्याही गोष्टीपेक्षा माणसातील कामजीवनाची समज श्रीनिवासला लवकर येते. आपली लग्नाची इच्छा आईला ( सगुणाबाई ) व नानांना बोलून दाखवितो. त्याप्रमाणे लग्न ठरविण्याचा कार्यक्रम होतो.

'श्रीनिवास' स्त्रीसुखासाठी उतावीळ आहे. त्याला अनेक मुली लग्नासाठी सांगून येतात. थोराड, मोठाड मुलीच तो पसंत करतो. कारण इतर कुठल्याही समजापेक्षा कामजीवनाची समज त्याला लवकर आलेली आहे. पुरुषत्वाच्या बाबतीत तो कमकुवत आहे. स्त्रीची कामवासना तृप्त करण्याची ताकद आपल्याजवळ नाही याची त्याला जाणीव आहे. नंदाशी विवाहबध्द झाल्यानंतरही तो कुसुमपासून दूर होऊ शकत नाही. उफाळते तारुण्य पाहून तो कामविव्हळ होतो.

फिरायला गेल्यानंतर नग्न स्त्रीला पाहताच त्याच्या वासना चाळवतात. लग्नानंतर पहिल्यारात्री अधाशीपणाने मीलनासाठी तो नंदाला धडक देतो. तो फक्त एक - दोन मिनिटेच . ऐन तारुण्यातील नंदाला तो तृप्त करू शकत नाही. त्याच्या कमकुवतपणाचा बळी नंदा ठरते. कुसुमच्या त्याच्यावरील प्रेमाच्या मुळाशी हेच प्रमुख कारण आहे.

श्रीनिवासचे कुसुमवर मानसिक प्रेम आहे. कुसुम पहिली प्रेयसी पण दोघांच्याही घरातील संमती नसल्यामुळे त्यांना विरोध होतो. कुसुमचा विवाह इंद्रनाथबरोबर होतो. पण कुसुम व श्रीनिवास या दोघांचे प्रेम कायमस्वरूपी राहते. कुसुम श्रीनिवासवर लग्नानंतरही प्रेम करू लागते. पण हे प्रेम शारीरिक नसते. दोघेही एकमेकांची काळजी विवाहानंतरही घेतात. श्रीनिवासचा नंदाबरोबर विवाह होऊन देखील तो कुसुमच्या घरी जातो. तिची चौकशी करतो. कुसुमच्या दुःखात सहभागी होतो.

आपल्या आई - वडिलांचे वैवाहिक जीवन पाहून तो अस्वस्थ होतो. रात्रीच्या वेळी

आपले आई - वडील काय बोलतात, त्यांचा श्वासोच्छ्वास एवढा कसा वाढतो आहे, याची तो गप्प राहून दखल घेतो. स्वतः भावनिक होतो. असा श्रीनिवास हा असहाय्य आहे. तो समोरच्या व्यक्तीचा विचार न करणारा आहे. नंदाशी विवाह होतो त्यावेळी त्याची कामुक वृत्ती लगेच जागी होते. घरी कोण आहे, नाही याचा विचार देखील तो करीत नाही. नंदाशी लगट करण्याचा प्रयत्न करतो. नंदाची साडी ओढणे, तिला चिमटे घेणे, हातात हात घेणे, चुंबन घेणे, चेष्टेने बोलणे या प्रकारात त्याचे शारीरिक प्रेम दिसून येते.

कुसुमचे लग्न होऊन देखील तो तिच्याशी संबंध ठेवतो. तिची विचारपूस करतो. प्रेमाच्या गप्पा मारतो. वास्तविक श्रीनिवासचे लग्न होऊन देखील तो नंदाशी एकरूप होत नाही. असा तो चंचलवृत्तीचा आहे. खरे तर कुसुमला हे योग्य वाटत नाही, तरीसुध्दा श्रीनिवासला नकारही देत नाही. कुसुमच्या हातातील पुस्तक वाचून त्यामधील स्त्री - पुरुष संबंधाच्या नीतिविषयक कल्पनांनी श्रीनिवास भारावून जातो.

श्रीनिवास नंदाशी विवाह करतो. पण तिच्याशी तो एकरूप होऊ शकत नाही. फक्त उपभोगासाठी तिचा उपयोग करून घेतो. आपल्या आई - वडीलांचे वैवाहिक जीवन पाहून तो अस्वस्थ होतो. स्वतःच्या आईकडे तो ' सगुणाबाई ' या दृष्टीने पाहत राहतो. आईचे बोलणे, चालणे, राहणे, तिचे कपडे हे सर्व त्याला वेगळाच दृष्टिकोन देतात. त्याच्या जीवनामध्ये कुसुम, मालती व नंदा अशा स्त्रिया येतात. पण खरे पाहता तो कोणत्याच स्त्रीशी एकरूप होऊ शकत नाही. नंदाच्या भावना तो ओळखत

नाही. त्याकडे दुर्लक्ष करतो. नंदा श्रीनिवासला खूप समजावण्याचा प्रयत्न करते, पण त्याच्यामध्ये कोणतेच बदल होत नाहीत. कादंबरीचे संपूर्ण कथानक श्रीनिवासभोवती फिरत राहते.

<u>कुसूम :</u>

'अपरंपार' कादंबरीतील तिसरी व्यक्तिरेखा कुसुमची आहे. बालवयात एका लग्नप्रसंगी तिच्यावर बलात्कार झाल्यामुळे पुरुषातील पौरुषत्वाची एक प्रकारची घृणा तिच्यामध्ये निर्माण झालेले आहे. पुरुषाच्या शारिरीक प्रेमापेक्षा मानसिक प्रेम तिला हवे आहे. प्रखर पौरुषत्वाची उणीव असलेल्या पुरुषांवर केवळ मानसिक प्रेम करत असते. म्हणून तर तिला श्रीनिवास हवा आहे. आणि इंद्रनाथ नको आहे. शरीर-सुखापेक्षा आंतरिक प्रेम तिला महत्वाचे वाटते.

कुसुमची संसाराविषयी मतप्रणाली पूर्णपणे बदललेली आहे. मनाविरुध्द पुरुषाशी मरेपर्यंत संसार करणे यामध्ये तिला पातिव्रत्य वाटत नाही. "संसार म्हणजे निर्बल स्त्रीला सबळ पुरुषाने लग्नबंधनात घरात आणणे, आणि स्त्रीने मरेपर्यंत त्याच्याशी एकनिष्ठ राहणे" [२१] म्हणून लग्नानंतरही कुसुमच्या प्रेमभावनेला नवे धुमारे फुटतात. इंद्रनाथलाही आपले प्रेमसंबंध मनमोकळेपणाने व सहजतेने ती सांगते. अशारितीने श्रीनिवास ,नंदा ,इंद्रनाथ यांच्या जीवनात सातत्याने डोकावणारी कुसुमची व्यक्तिरेखा आहे.

कुसुम व नंदा या दोघींची भेट होते. त्यावेळी कुसुम आपले संपूर्ण दुःख

नंदाला सांगत राहते. या तिच्या सांगण्याप्रमध्ये स्पष्टपणा दिसून येतो. इंद्रनाथबरोबर लग्न झाल्यापासून ते आजपर्यंतचे सांसारिक जीवन कुसुम नंदाला सांगते , " खरचं सांगते नंदा , तू संशय घेऊ नकोस. तसे ते फार सुंदर आहेत. एरवी अतिशय उमदेपणाने वागतात , पण ती वेळ आली की त्यांचा तोल सुटतो. त्यांच्यात राक्षस संचारतो. पशूसारखे ते वर्तन करतात. मला सहन होत नाही. माझं आभाळ फाटतं " [२२] या तिच्याशब्दामधून तिचे आंतरिक दुःख , तिची भावनिक अवस्था स्पष्ट होते . ती म्हणते, " एक तरुण अनुभवी स्त्री आधारावाचून काय करू शकते ? मी इंद्रनाथशी लग्न केलं आणि माझं आभाळ फाटलं ! " [२३] ही सर्व दुःखे तिची लहानपणापासूनचीच आहेत. कुसुम ती दुःखे ती सोसत राहते.

इंद्रनाथ :

इंद्रनाथ धडधाकट, पौरुषत्वाच्या खुणा सर्वत्र असणारा आहे. त्याला ज्यादिवशी कुसुम हवी असते. त्यादिवशी तिला मारपीट केल्याशिवाय तिच्यापासून त्याला समाधान मिळत नाही. तिच्या लुळ्या पडलेल्या शरीराच्या दोन्ही काखेत हात घालून तो सुख घेतो. कोणत्याही स्त्रीनं पुलकीत व्हावे असं चैतन्य इंद्रनाथचे आहे. एवढेच नव्हे तर पहिल्या भेटीतच नंदाचे मन आकर्षित करून घेतो .

कुसुमचा नवरा इंद्रनाथ , जितका संयमशील तितकाच क्रूर व बेजबाबदार आहे. काळाकुट्ट, दणकट व राकट अशी त्याची शरीरयष्टी भारदस्त आहे. श्रीनिवास अनेक विचारांच्या तंद्रीत असतो. त्यावेळी आपण कोठे आहोत याचे भान त्याला नसते. तो

रस्त्याच्या मध्येच विचार करत असताना इंद्रनाथ त्याला जागा करतो. आपण कशाच्या विचारात आहात ? असा श्रीनिवासला प्रश्न करतो . पण शेवटी इंद्रनाथ व्यवस्थित जाण्यास सांगतो. कुसुमचा निरोप देण्यास तो विसरत नाही असा विचारशील इंद्रनाथ आहे.

इंद्रनाथ स्वैर व विक्षिप्त वृत्तीचा आहे. त्याला स्त्री-मनाची पर्वा नाही. स्त्रीच्या भावना , विचार, कल्पना तो समजून घेत नाही. कुसुमला अनेकवेळा मार देतो आणि आपल्या वासना भागवून घेतो. काहीवेळा कुसुम बेशुद्धावस्थेत असताना इंद्रनाथ मात्र बेहद खूष होतो. त्याच्या सुखाला पारावर उरत नाही. , एखाद्या लांडग्याने शेळीवर तुटून पडावे अशी त्याची कृती दिसून येते.

तो नंदाच्या घरी बिनधास्त जातो. नंदाच्या शरीराकडे पाहून आकर्षित होतो. नंदाचा ज्यावेळी तोल जातो त्यावेळी तो तिला सावरतो. नंदाचा स्पर्श त्याला कुसुमपेक्षा हवाहवासा वाटतो. नंदाच्या घरी कोणी नाही याचा फायदा घेऊन तो तिच्याशी लगट करतो. तिच्याशी गोड बोलताना त्याच्या बोलण्याने वाईट वृत्ती दिसून येते. एकूण त्याचा लाचखोपणा , बिनधास्तपणा त्याच्या व्यक्तिमत्वातून दिसून येतो.

अशा रीतीने कुसुम नवऱ्याच्या लैंगिक अत्याचाराने दुःखी होते तर नंदा लैंगिक सुख न मिळाल्याने दुःखी होते. तर श्रीनिवास व इंद्रनाथ लैंगिक तृप्ती मिळवणारे पण आपल्या बायकांचा विचार न करणारे आहेत हेच नाट्य येथे स्पष्ट होते.

**सगुणाबाई :**

या कादंबरीतील आणखी एक व्यक्तिरेखा म्हणजे सगुणाबाई. नंदापेक्षा पूर्ण वेगळी आहे. कौटुंबिक रूढी, संकेत, संस्कार फारसे न पाळणारी, स्त्री - पुरुष संबंधाविषयी आपल्या मुलाशी व सुनेशी अगदीच मोकळेपणाने बोलणारी एक स्त्री म्हणून आपल्या वाट्याला आलेले अनुभव सहजतेने व्यक्त करताना दिसते. परंतु या अनुभवात एक प्रकारची लैंगिक सुखाची अतृप्तता आहे. मुलगी बरोबरीची केली म्हणजे थोड्याच वर्षात मुलीची बाई होते. आणि मुलाचा पुरुष व्हायला फार वेळ लागतो. असा अनुभवाचा सल्ला त्या आपल्या मुलाला देतात. नानांच्या निस्तेज पौरुषत्वाचा परिणाम सगुणाबाईच्या कामजीवनावर झालेला आहे. तेव्हा संधी मिळेल तेव्हा सगुणाबाई आपल्या लैंगिक वासना भागविण्याचा प्रयत्न करतात. नंदाला न्हावू घालताना सगुणाबाईंचे हात स्वैर सुटतात. स्त्री - पुरुष स्पर्शाचे मिश्रण त्यात आहे. याची जाणीव नंदाला होते. कुठल्यातरी विकृतीने पछाडल्यासारख्या सगुणाबाई दिसतात. सगुणाबाई नंदाला स्वप्नाविषयी सांगतात, " अगं, स्वप्नात मी पुरुषच झाले. अगदी संपूर्ण पुरुषच बरं का? खरखरीत दाढी आणि भरदार मिशा असलेला पुरुष " सगुणाबाई पुढे आणखीन सांगू लागल्या, " आणि मी मग ह्यांच्या गालावर माझी खरखरीत दाढी घोळली. ह्यांचे गाल भयंकर गुळगुळीत लागले मला. आहेतच तसले यांचे गाल गुळगुळीत अगं त्यांना फक्त हनुवटीजवळ दाढी आहे. बाकी दोन्ही गालावर दाढी मुळीच नाही. अगदी बायकांसारखे मऊ ऽ मऊ ऽऽ ! " [२४] असे स्वैरपणे

सगुणाबाई नंदाला सांगतात. तिच्या या सांगण्यातून तिची अतृप्त इच्छा दिसून येते. नंदाच्या मनात श्रीनिवासविषयी काही गैरसमज निर्माण होतील याचा सारासार विचार न करता , श्रीनिवास व कुसूम यांच्यातील प्रेमसंबंध निसंकोचपणे त्या नंदाला सांगतात. श्रीनिवासवर लक्ष ठेवण्याची सुचनाही जाता जाता नंदाला देतात.

श्रीनिवास ज्यावेळी मालतीला काहीच न पाहता तिच्या एकूण शरीराकडे पाहून तो आकर्षिला जातो आणि आपल्या पसंतीबद्दल आईला बोलतो तेव्हा सगुणाबाईंनी श्रीनिवासला खूप समजावण्याचा प्रयत्न केला. पण तिचा सल्ला तो ऐकत नाही. तेव्हा सगुणाबाई म्हणतात बरं बाबा , तुझे तू पाहून घे . ज्याचे दुःख त्यानेच भोगायचं असते. काही माणसांना सांगून पटत नाही. भोग भोगून झाला म्हणजे लक्षात येते. आणि मग पश्चाताप होतो. पण त्याचा काही उपयोग होत नाही. यातूनही सगुणाबाईच्या लैंगिक वासना जागृत होताना दिसतात. तिच्या या शब्दांमध्ये कामुक वृत्ती दिसून येते.

सगुणाबाई एके दिवशी भरदुपारी नंदाच्या खोलीत जातात. यावेळी त्यांनी सफेद साडी नेसली होती वा सफेद साडीमुळे त्यांच्या भावना जागृत होत असतात. नंदाच्या खाजगी वैयक्तिक आणि गुप्त जीवनात प्रवेश करताना दिसतात. " अगं हा श्री. काय करीत होता ? आला होता की नाही घरी वेळेवर ? " २५ या शब्दातूनही त्यांची कामुक वृत्ती दिसून येते.

सगुणाबाई नानांना न विचारताच सिनेमाला जातात. स्वतःच्या इच्छा - आकांक्षा ती

बाहेरून भागवून घेत असतात. त्यातच त्यांना आनंद वाटतो. घरात आणि घराबाहेरही मुक्तपणे वागतात. याचे कारण नानाचे अपराधीपण, नानाकडून इच्छा पूर्ण होत नाहीत त्यामुळे त्या बाहेर व घरात अगदी मनमोकळेपणाने वागतात. त्यांच्या प्रत्येक शब्दांत कामुक वृत्ती दिसून येते.

नाना :

एकूण पात्रांपैकी नाना ही व्यक्तिरेखा बंडखोरी आहे. पण कुठेही सामाजिक कार्य, स्वतःची जबाबदारी असे काहीच त्यांच्याकडून दिसत नाही. घरातील प्रत्येक व्यक्ती कशी आहे, कशी नाही याचा नानांचा अभ्यास आहे. ते सगुणाबाईशी फटकून वागतात पण श्रीनिवास व नंदा यांच्यांवर मनापासून प्रेम करतात. त्यांना व्यवहारी दृष्टिकोण सांगतात. श्रीनिवासच्या दुःखात सहभागी होतात. तो योग्य मार्गावर येण्यासाठी प्रयत्न करतात.

'नाना' एक कुटुंबप्रमुख म्हणून श्रीनिवास व नंदा यांच्यावर अप्रत्यक्ष - प्रत्यक्ष संस्कार करीत राहतात. समाजातील परिस्थिती ही आपल्या मुलापुढे व सुनेपुढे व्यक्त करतात. तरुणपण कसे असते, त्यामध्ये कोणकोणत्या अडचणी येतात. तसेच स्त्री - पुरुष संबंध, प्रेम यांचेही स्पष्टीकरण नाना आपल्या मुलाला देतात.

नानांच्याठिकाणी आधार देण्याची वृत्ती दिसून येते. एक दिवस श्रीनिवास कुसुमच्या अनेक आठवणींने पुरता घायाळ होतो. त्याला समोरचे काहीच दिसत नाही. कसातरी तो घरी आलेला असतो. अशा स्थितीत नाना श्रीनिवासला हाक मारीत

त्याच्याजवळ जातात. आणि आपल्या मुलाच्या पाठीवरून प्रेमाने हात फिरवतात. वडिलांचे बोलणे व त्यांचा स्पर्श श्रीनिवासला कृतार्थ वाटत होता. श्रीनिवासचे अनेक प्रश्न नाना सोडवतात. नानांना त्याची भावना कळत असे. ते त्याच्या पाठीवरून हात फिरवीत, गोड बोलत. त्यामुळे श्रीनिवासचे संपूर्ण दुःख, सारा शीण नाहीसा होत असे.

नाना श्रीनिवासच्या दुःखात सहभागी होतात. श्रीनिवास दुःखी आहे, त्याचे मन कुठेतरी अडकले आहे हे नाना तावडतोब ओळखतात. आणि म्हणतात," संसारात स्त्री येणं ही आपल्याला प्रथम वाटते तेवढी आनंदाची गोष्ट नसते. !, मला कळते तुझं मन." [२६] यातूनच नानांचे खरे व्यक्तिमत्व स्पष्ट होते.

एक वडील म्हणून ते श्रीनिवासची मनापासून काळजी घेतात. अनेक प्रकारचे तत्वज्ञान, आदर्श श्रीनिवासला शिकवतात. तारुण्य कसे असते, त्यामध्ये कोणकोणत्या चुका होतात आणि त्यातून कसे बाहेर पडले पाहिजे असाही सल्ला नाना देतात.

नाना सुनेवर प्रेम करणारे आहेत. ते अनेकवेळा सहकार्य करतात. कुटुंबात काही किरकोळ वस्तू लागत असतील तर नंदाच्या परवानगीने ते आणत असत. आपल्या मुलाने व सुनेने आनंदात फिरावे, सुख - दुःखाच्या गोष्टी बोलाव्यात असे नानांना वारंवार वाटते. नाना - श्रीनिवास व नंदा हे तिघेही अत्यंत खेळीमेळीने राहतात. समाजाबद्दल स्वतःला आलेला वाईट अनुभव आपल्या मुलाला सांगत राहतात.

नाना पोमटाला सर्व काही शिकवतात व त्याच्यावर प्रेम करतात. मुक्या पक्ष्यांना जपले पाहिजे असे नंदाला सांगतात. या सर्व गोष्टीतून नानांची अतृप्तता

दिसून येते. मानसिक स्थिती व्यवस्थित राहावी म्हणून देवाला जातात. याची कल्पनाही नंदाला देतात. स्वतःच्या पत्नीपुढे नांगी टाकतात. सगुणाबाईशी औपचारिक असे काहीच बोलत नाहीत. परिस्थितीशी समायोजन करणारे नानाचे व्यक्तिमत्व आहे.

चंद्रा :

चंद्रावती दिसायला मध्यम होती. तिचे आई -वडील श्रीमंतीत वाढलेले होते. चंद्रावतीचे संगोपन या सुस्थितीत असलेल्या घरात झाले. तिला कशाचीही काळजी नव्हती त्यामुळे तिचे बालपण सुखात गेले. त्याचप्रमाणे तिचे सासरही गर्भश्रीमंत होते. सासू, सासरे व नवरा यांचे प्रेम तिला मिळत असे.

चंद्रावती माहेरी बाळंतपणासाठी आली होती. आपल्या आईच्या घरी ती निवांत होती . दोन वेळा जेवणे व झोपाळ्यावर झोके घेणे . या झोके घेण्यामध्ये तिला आनंद वाटे. एक दिवस ती एकटीच झोके घेत होती यावेळी तिच्या अंगावर पोपटी रंगाची साडी खुलून दिसत होती. त्यामुळे झोके घेताना तिचे सारे शरीर चकाकत असे. झोके घेताना चंद्राला आनंद वाटे. यावेळी तिची बालमैत्रीण नंदा येते. आणि तिच्या आनंदाला पारावार राहात नाही. बऱ्याच वर्षांनंतर नंदा भेटल्यामुळे चंद्राचा आनंद द्विगुणित होतो. नंतर चंद्रा व नंदा सासरच्या सुख -दुःखाची आठवण काढतात. एकंदरीत चंद्रावती सुखी असते. ती नंदाची चौकशी करते. नंदाचे सासरचे अनुभव ऐकून चंद्राला वाईट वाटते. नंदाचे हसणे तिला केविलवाणे वाटते. चंद्राच्या विचारामध्ये एक प्रामाणिकपणा व मैत्रिणीविषयी असणारी आस्था स्पष्ट दिसते. नंदाच्या संपूर्ण

दुःखात ती सहभागी होते. आपण कसे राहिले पाहिजे , दुःख कसे सहन केले पाहिजे, सासरच्या सर्व लोकांना कसे प्रेम दिले पाहिजे, नवऱ्यावर कसे प्रेम करायचे या बारीक - सारीक गोष्टी चंद्रा नंदाला सांगते.

चंद्रा स्वतःच्या श्रीमंतीचा कुठेही उल्लेख करीत नाही. नंदाबरोबर बोलताना , फिरताना तिच्या दुःखाशी एकरूप होते. स्वतःच्या मनाला पडलेले अनेक प्रश्न ती सहजपणे नंदाला सांगते. तिच्या मनाची होणारी चलबिचल नंदाला सांगते. " काही काही वेळा काय होतंय ते समजतच नाही वाटते , हे सगळं खोटंय , क्षणभंगुर आहे. जड जड वाटते , पोटात जड वाटते. सगळं जड वाटते. काहीतरी विचार मनात येत राहतात. कुणाचा तरी सहवास हवासा वाटतो. नवऱ्याचा नको वाटतो, आईचा नको वाटतो. फार फार विचित्र वाटते गं नंदा. " २७ अगदी सहजपणे पण शेकडे बोलत होती. या चंद्राच्या विचाराने नंदाला देखील आपल्या आयुष्याची आठवण होत होती.

चंद्राची दोन्ही घरची परिस्थिती चांगली असूनदेखील ती समाधानी वाटत नाही. तिचे झोके घेणे , चांगली कापडे परिधान करणे , चांगले बोलणे हे फक्त औपचारिक वाटते. त्यामध्ये कोठेही समाधान दिसत नाही. तिला मैत्रीण ही आधार असते. दुःखी व्यक्तीची जगण्याची आशा चंद्राच्या माध्यमातून दिसते.

**नंदाचा भाऊ ' बाळू ' :**

नंदाचा लहान भाऊ बाळू हा प्रेमळ आहे. तितकाच तो रागीटही आहे. ज्यावेळी नंदा व चंद्रा या दोघी एकमेकींच्या सासरचा विषय काढून गप्पा मारीत बसतात.

त्यांच्या गप्पा बराच वेळ चालतात. त्यावेळी बाळू आपल्या वहिणीला म्हणजे नंदाला उशीर झाल्याचे सांगतो. नंदाच्या एकूण सुख - दुःखात बाळूचे सत्कार्य खूप मोठे असते. भावाचा आवाज ऐकून नंदाचे चेहऱ्यावरचे दुःख नाहीसे होते. आणि त्याच्याकडे पाहून ती हसू लागते. आपली बहीण बरेच दिवसांनी आली आहे याचा आनंद त्याच्या चेहऱ्यावर ओसंडत असतो. तो वहिणीसाठी गावाला जायाचे रद्द करतो . इतका तो सरळ व प्रेमळ आहे.

**श्रीनिवासची बहीण ' शशी ' :**

शशी श्रीनिवासची धाकटी बहीण . शशीचे प्रेम आपल्या भावावर आहे. अगदी मनमोकळेपणाने ते दोघेही बोलतात. एकमेकांची थट्टाही करतात. एक दिवस श्रीनिवास मुलगी पाहतो पण मुलगी पाहून झाल्यानंतर त्याला झोप लागत नाही. रात्रंदिवस तिचाच ध्यास घेतो . अशावेळी शशी आपल्या भावाची चहा पित असताना थट्टा करते. त्याला अनेक प्रश्न विचारते. श्रीनिवासही आपल्या बहिणीच्या प्रश्नाला हसत-हसत उत्तरे देतो. असे हे बहीण - भावाचे नाते पारगावकरांनी उत्तम रेखाटलेले आहे.

शशी मिस्किल आहे. आपल्याला आलेले अनुभव ती श्रीनिवासला थट्टेने विचारते " मग ? आपुलकीनंच विचारतेय ! आता लग्न झाले की संसार कसा मांडायचा , कुठं मांडायचा , तिच्याशी ( ! ) कसं बोलायचं , काय बोलायचं , केव्हा बोलायचं , कुठं बोलायचं , एकान्त कसा गाठायचा ...." [२८] असे ती आपल्या भावाला म्हणते. या तिच्या बोलण्यातून तिची सरळ वृत्ती दिसून येते. माहेरी आल्यानंतर आपल्या आईशी,

भावाशी व नानाबरोबर अगदी मनमोकळेपणाने ती बोलत राहते. एक साधीच पण उत्तम व्यक्तिरेखा रेखाटण्याचे काम पारगावकरांनी केले आहे.

**देवजी :**

देवजी नंदाच्या माहेरचा विश्वासू गडी. शेतीची अनेक कामे करणारा, घराची देखभाल करणारा, पडेल ती कामे करणारा, घरातील सर्वांचा लाडका असा देवजी आहे.

एक दिवस नंदा माहेरी येते आणि चंद्रा आपल्या मैत्रिणी सोबत रानात येते. आणि विहिरीच्या काठावर बसून त्या दोघी संसाराविषयी गप्पा मारत बसतात. नंदाला पाहताच देवजीच्या आनंदाला पारावार राहात नाही. तो धावत - धावत नंदाजवळ येऊन उभा राहतो आणि तिची खुशाली विचारतो. नंदाचे प्रत्येक काम ऐकणारा देवजी प्रामाणिक आहे. शेतातील हिरव्या रानाकडे, डेरेदार चिंचेच्या झाडाकडे आणि माळाकडे पाहून नंदा आनंदी झाली होती.

देवजी आपल्या मालकीणबाईसाठी आनंदाने हुर्डा भाजून देतो. अशारीतीने देवजी ही व्यक्तिरेखा कथानकाला पूरक ठरली आहे.

व्यक्तिचित्रणानंतर जीवनदर्शनाचा विचार करावयाचा आहे.

**जीवनदर्शन :**

वि. शं. पारगावकर स्त्री - पुरुषांतील लैंगिक जीवनाकडे अधिक धीटपणे पाहतात. स्त्री - पुरुषातील लैंगिक जीवनातील दुःखे स्पष्ट करण्यासाठी आपल्या कादंबरीतील मध्यवर्ती समस्या लैंगिक जीवनच आहे, असे कल्पून कौटुंबिक पार्श्वभूमी

तयार करतात.

श्रीनिवास आणि नाना पौरुषत्वाच्या बाबतीत कमकुवत आहेत. त्यांचे जीवन असून नसल्यासारखेच आहे. श्रीनिवास संभोगात सुरुवातीला भावनिक होतो पण एक - दोन मिनिटेच ते टिकतो. नंतर तो तसाच गप्प राहतो. नंदाची इच्छाच पूर्ण करू शकत नाही.

नंदा व सगुणाबाई मात्र उफाळल्या उन्मत पुरुषत्वाच्या पूजक आहेत. परंतु असले कमकुवत पुरुष जीवनात आल्यामुळे अतृप्तीचे अपरंपार दुःख त्यांच्या वाट्याला येते. स्त्रियांना लग्नानंतर जर नवऱ्याने टाकले तर त्यांनाही आयुष्याचा होम करावा लागतो. समाजात किंमत राहत नाही. एक परित्यक्ता म्हणूनच होम करावा लागतो. समाजात किंमत राहात नाही ,एक परित्यक्ता म्हणूनच समाज त्यांच्याकडे पाहातो. याची जाणीव नंदा व कुसुम यांना आहे. त्यामुळे जीवनात कितीही अडचणी आल्या तरीसुध्दा त्या पतीपासून दूर जात नाहीत. तर आपले दुःख आपणच सहन करतात.

वि. शं. पारगांवकरांच्या कादंबऱ्यातील पात्र पदोपदी सुसंस्कारांना जपतात. प्र-संगी त्यांच्याकडून वाईट कृत्ये घडली तर ते एकमेकांवर चिडतात. अथवा पश्चाताप व्यक्त करतात. संस्कार आणि नैसर्गिक भावना यांच्या संघर्षात त्यांची पात्रे अडकली आहेत. मध्यमवर्गीय जीवनाच्याही काही मर्यादा असतात. त्यामुळे ही पात्रे दुःख सोशीत राहतात. कनिष्ठ अथवा उच्च वर्गियांसारखी ती बिनधास्तपणे, बेधडकपणे वागूच शकत नाहीत. आपल्या दुःखावर विचार करणे अथवा मित्र - मैत्रिणींपुढे ते व्यक्त करणे एवढेच

ती पात्रे करू शकतात.

जीवनदर्शनानंतर संघर्ष या घटकाचा विचार करणे अगत्याचे आहे.

<u>संघर्ष</u> :

वि. शं. पारगावकर यांनी श्रीनिवास व नंदा, नंदा व कुसुम यांच्यातील संघर्ष दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. एकमेकांबद्दल असणारा गैरसमज, अपेक्षा अविश्वास यातून निर्माण झालेला हा संघर्ष आहे.

आपला पती स्त्री दुःखाकडे कसा पाहतो हे जाणून घेण्याचा नंदाचा येथे प्रयत्न आहे. नंदा श्रीनिवासला म्हणते,

" तुम्हांला त्याचं काहीच वाटत नाही ? "

" त्या बाईविषयी. तिला ओढत नेणाऱ्या त्या माणसाविषयी ? "

" वाटल्याशिवाय कसं राहील ? "

" मग तुम्ही असं का हसलात ? "

" नसेल ! पण सहानुभूती तरी वाटेल की नाही एखाद्याला ...... " [२९]

हा संवाद नंदा ही श्रीनिवासच्या मनाचा अंदाज घेण्याचा प्रयत्न करते आहे. श्रीनिवासच्या मनात जर सहानुभूती असेल ; तर तो आपल्यालाही समजून घेऊ शकेल असे नंदाला वाटत असते.

नंदा व श्रीनिवास यांच्यातील संघर्ष हा कुसुममुळे सतत उद्भवतो. श्रीनिवासबद्दल असणारा गैरसमज नंदा सतत बोलून दाखविते.

" मग कुसुम तुमच्या आयुष्यात कशासाठी येते ? "

" कारण तिचं माझ्यावर प्रेम आहे. '

" पण तुम्ही आता असं गुंतून राहू शकत नाही. "

" हा मी गुंतवण्याचा प्रश्नच नाही. "

" मग एवढी गुंतागुंत कशी झाली ? "

" मी झटकून टाकू शकत नव्हतो. हा माझा दुबळेपणा असेल ; तो दोषही असेल ! " [३०]

नंदाला वाटते, आपल्या पतीने केवळ शरीर संबंधाबाबत तसेच मानसिक संबंधाबाबतीत आपल्याशी प्रामाणिक राहिले पाहिजे. आपल्या इच्छा- आकांक्षा श्रीनिवासने पूर्ण कराव्यात असेही तिला वाटते. आणि यासाठीच नंदा व श्रीनिवासचा संघर्ष उद्भवतो.

श्रीनिवास म्हणतो, शारीरिक संबंधाबाबत आपण एकनिष्ठ आहोत. पण मानसिक संबंधाबाबत भले आपण कुसुममध्ये अडकलो असलो तरी त्याकडे नंदाने दुर्लक्ष करावे.

नंदा व कुसुम या दोघांतील संघर्ष पारगावकरांनी तितक्याच कौशल्याने चित्रित केला आहे. श्रीनिवासमुळे या दोघींतील संघर्ष घडलेला आहे. नंदा तशी स्वाभिमानी वृत्तीची आहे. आपल्या संसारात कुसुमने येऊ नये असे तिला वाटते. लग्नापूर्वी जे काही झाले असेल ते ठीक, असे नंदा मानते. पण लग्नानंतर यांचे भेटणे हे नंदाला आवडत नाही. आणि यातूनच संघर्ष उद्भवतो.

" तुझे अगोदर श्रीनिवासवर प्रेम होते. ! "

" हो अजूनही आहे; पण ते पाप नव्हते ! "

" हो, आता ते पाप आहे. पण यात माझी काही चूक आहे का ? "

" मग चूक कुणाची आहे ? माझी ? "

" मी तुला दोष देत नाही "

" ते तुझ्याकडे सारखे येतात आणि तू त्यांना फूस लावतेस ! " [३१]

पात्रांच्या वेगवेगळ्या भूमिका आणि त्यांचे भिन्न भिन्न दृष्टिकोन यामुळे हा संघर्ष अधिक नाट्यमय झालेला आहे. त्यामुळे लैंगिक जीवनाचे बहुविध वर्शन घडते. कादंबरीचे आशयसूत्र अधिक स्पष्ट करणारा हा संघर्ष आहे.

संघर्षानंतर व्यक्ती - व्यक्तीतील परस्पर संबंधाचा विचार करणे ओघानेच येते.

श्रीनिवास आणि कुसुम यांचे प्रेम शारीरिक नसून आंतरिक आहे. ते दोघेही एकमेकांची काळजी घेतात. कुसुमचा विवाह इंद्रनाथ बरोबर होतो, पण तरी देखील ते एकमेकांना विसरत नाहीत. श्रीनिवास कुसुमच्या घरी अधूनमधून जात असतो. तिच्या तब्येतीची काळजी घेतो. एक दिवस कुसुम आजारी पडते, त्यावेळी श्रीनिवास अस्वस्थ होतो. आपल्या मनातील अस्वस्थपणा तो नंदाजवळ व्यक्त करतो. इतका तो सरळ मनाचा आहे.

श्रीनिवासचा नंदाबरोबर विवाह होतो. तरीही तो कुसुमपासून अलिप्त होत नाही. नंदाला पूर्वीच्या घटना तो सांगत राहतो. ज्यावेळी इंद्रनाथ कुसुमला मारहाण करतो

आणि तिचा उपभोग घेतो त्यावेळी कुसुम बेशुद्ध पडते. यावेळी श्रीनिवास दुःखी होतो. तो नंवाला म्हणतो, " मग माझ्यावर तर तिनं प्रेम केलंय. एके काळी माझ्याशी तिला लग्न करायचं होतं पण आमच्या आईला ती पसंत नव्हती. माझ्यापेक्षा वयानं देखील ती मोठी आहे, आणि आई म्हणाली ती तुला खाऊन टाकील " [३२] असे श्रीनिवासने नंवाला स्पष्टपणे सांगितले. या त्याच्या सांगण्यामध्ये कोणताही आडपडदा नव्हता.

कुसुम व इंद्रनाथ यांचे संबंध वैवाहिक आहेत. कुसुमचे खरे प्रेम श्रीनिवासवर आहे. पण घरच्या लोकांच्या दडपणामुळे तिला इंद्रनाथबरोबर लग्न करावे लागते. वैवाहिक जीवनात ती आपला संयम ढळू देत नाही. इंद्रनाथने कितीही मारले तरी ती घर सोडत नाही. त्याची पाशवी वृत्ती तिला नको वाटते. तरीही ती घरातून बाहेर पडत नाही. आपले दुःख स्वतःच सहन करीत असते.

श्रीनिवास व नंवा हे वैवाहिक जीवनात सुखी नाहीत. याचे कारण श्रीनिवास कुसुमकडे आपोआप ओढला जातो. त्याची कामांध वृत्ती नंवाच्या इच्छा पूर्ण करीत नाही. दोघेही एकमेकांना समजून घेण्याचा प्रयत्न करतात. नंवा स्वतःचे दुःख स्वतः सहन करीत असते. श्रीनिवास आपला पती आहे याची पूर्ण जाणीव नंवाला असते. त्यामुळे ती त्याच्याशी एकरूपतेने वागते. भांडण-तंटा , शंका, रुसणे असे असले तरीसुध्दा ती सासर सोडत नाही . उलट ती त्यांच्याशी प्रेमाने वागते.

नाना व सगुणाबाई यांचेही वैवाहिक जीवन दुःखी आहे. सगुणाबाई यांच्या इच्छा नाना पूर्ण करीत नाहीत. सगुणाबाई आपल्या भावना नंवापुढे व्यक्त करते. नंवाला

अंघोळ घालताना तिचा हात स्वैर सुटतो आणि आपल्या इच्छा त्या भागवून घेतात.

नंदा व चंद्रावती यांच्यातील मैत्रीचे संबंध फार जुने आहेत. चंद्रा ही बालपणातील नंदाची मैत्रीण. सध्या दोघीही विवाहित आहेत. चंद्रा बाळंतपणासाठी माहेरी येते. आणि नंदा सासरी करमत नसल्यामुळे माहेरी येते. यावेळी दोघीही एकमेकींची खुशाली विचारतात. यावेळी सुख-दुःखाच्या गोष्टी निघतात. नंदा चंद्राच्या अनेक प्रश्नाने दुःखी होते. पण शेवटी नंदा आपले दुःख चंद्राला अगदी मनमोकळेपणाने सांगते. नंदाच्या अनेक प्रश्नामध्ये एक असाहय्यता दिसते. ती चंद्राला म्हणते, ' तुझ्या नवऱ्यापासून तुला सुख मिळते का ग ? हो, पण मुख्य सुख ? ' या तिच्या प्रश्नातून चंद्राला तिचे दुःख समजून येते. चंद्रावतीचे सासरचे सुख पाहून नंदाला अनेक प्रश्न पडतात. नंदाच्या मनातील दुःख माहेरी मैत्रिणीजवळ व्यक्त होते.

नंदाचे आपल्या सासऱ्यावर फार प्रेम आहे. प्रत्येक गोष्टीत नानांना ती विचारत राहते. नानांचा स्वभाव तसा फार प्रेमळ व लाघवी आहे. घरातील प्रत्येक गोष्ट नाना नंदाला समजून सांगतात. नंदाही बाहेर कुठे जायचे असेल तर प्रथम ती नानांना विचारते. नंदा बरेच दिवस माहेरी गेल्यामुळे नानांना करमत नाही, ते अस्वस्थ होतात. आणि नंदा सासरी येताच आपला आनंद व्यक्त करतात. श्रीनिवास व नंदा या दोघांनी सतत बाहेर आनंदाने फिरावे, जीवनाचा उपभोग घ्यावा असे नानांना वाटते. आणि ते नंदाला बोलूनही दाखवितात. घरामध्ये काय हवे याची काळजी नाना करतात. भाजीपाला व इतर वस्तू ते घरी आणतात. नंदाला कोणताच बाहेरचा त्रास नाना देत

नाहीत. नंदा आपल्या सासऱ्याशी प्रेमळपणे वागते.

या सगळ्या संबंधात दुसऱ्या व्यक्तीचा विचार, त्याच्या विषयीचे अगत्य महत्त्वाचे ठरते. लैंगिक सुख हे दोघांनी उपभोगावयाचे असते. आपली तृप्ती जितकी महत्त्वाची तितकीच आपल्या जोडीदाराचीही तृप्ती महत्त्वाची असते. या जविनसत्याचे प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष दर्शन या कादंबरीतून घडते.